आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 22/10/2026 METRO CITY VRUTANT

> मुख्य संपादक : शबनम सय्यद > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 224 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# राज्यातील शाळांना 2 नोव्हेंबरपासून दिवाळीची सुट्टी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : दिवाळीच्या सुट्ट्यांची प्रतीक्षा करणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. राज्यातील सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी दिवाळीच्या सुट्ट्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, 2 नोव्हेंबर 2026 पासून विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी सुरू होणार असून, 16 नोव्हेंबर 2026 पासून शाळा पुन्हा सुरू होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सणादरम्यान सुट्टीचा आनंद घेता येणार आहे.**



राज्याच्या शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्षातील सत्रांची रचना आणि सुट्ट्यांचे नियोजन जाहीर केले आहे. माध्यमिक शाळा संहितेनुसार, चालू शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र 15 जून 2026 रोजी सुरू झाले होते. हे सत्र 31 ऑक्टोबर 2026 रोजी संपणार आहे. त्यानंतर दिवाळीच्या सुट्ट्या सुरू होतील आणि सुट्ट्या संपल्यानंतर दुसऱ्या शैक्षणिक सत्राला सुरुवात होईल.उपलब्ध वेळापत्रकानुसार, विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी 2 नोव्हेंबर ते 14 नोव्हेंबर 2026 या कालावधीत दिवाळीची सुट्टी असणार आहे. या कालावधीत धनत्रयोदशी, दिवाळी पाडवा, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज यांसारख्या सणांचा समावेश आहे. दिवाळी हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा आणि उत्साहाचा सण असल्याने या सुट्ट्यांमध्ये कुटुंबीयांसोबत सण साजरा करण्याची संधी मिळणार आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांनंतर रविवार, 15 नोव्हेंबर रोजी साप्ताहिक सुट्टी असल्याने सोमवार, 16 नोव्हेंबर 2026 पासून शाळांचे नियमित कामकाज पुन्हा सुरू होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सुट्ट्यांचे नियोजन करताना शाळा सुरू होण्याची तारीख लक्षात घ्यावी. पहिले शैक्षणिक सत्र 31 ऑक्टोबर रोजी संपल्यानंतर दुसरे सत्र 16 नोव्हेंबर 2026 पासून सुरु होणार आहे. हे सत्र 1 मे 2027 पर्यंत चालणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी मिळणार आहे.शैक्षणिक वेळापत्रकानुसार, 3 मे 2027 ते 14 जून 2027 या कालावधीत उन्हाळी सुट्टी असणार आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्षातील उर्वरित अभ्यासक्रम, परीक्षा आणि अन्य शालेय उपक्रमांचे नियोजन या वेळापत्रकानुसार करावे लागणार आहे. माध्यमिक शाळा संहितेनुसार, संपूर्ण शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या सुट्ट्यांची एकूण संख्या 76 दिवसांपेक्षा अधिक होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश शाळांना देण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्षातील अभ्यासाचे दिवस, सण-उत्सवांच्या सुट्ट्या आणि उन्हाळी सुट्टी यांचा समतोल राखून शाळांनी नियोजन करणे अपेक्षित आहे.दरम्यान, दिवाळीच्या सुट्ट्यांचे वेळापत्रक जाहीर झाल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना पुढील नियोजन करणे सोयीचे होणार आहे. सुट्ट्या संपल्यानंतर 16 नोव्हेंबरपासून दुसरे शैक्षणिक सत्र सुरु होणार असल्याने विद्यार्थ्यांनी त्यानुसार तयारी ठेवावी.

# दिवाळी, दसरा, नवरात्रोत्सवातही फटाके, डीजे आणि लेझरवर निर्बंध!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : दिवाळी, दसरा, नवरात्रोत्सव आणि अन्य सण-उत्सवांच्या काळात सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडणे, डीजे व ध्वनिक्षेपकांचा वापर करणे तसेच लेझर लाइट आणि तीव्र प्रकाशझोतांचा वापर करण्याबाबत कडक निर्बंध लागू असल्याचे बारामती शहर पोलिसांनी स्पष्ट केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हे निर्बंध केवळ गणेशोत्सवापुरते मर्यादित नसून सर्व सण-उत्सवांना लागू असल्याचे पोलिसांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे नागरिकांच्या निदर्शनास आणून दिले आहे.**



सण-उत्सव साजरे करताना ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी नागरिक, सार्वजनिक उत्सव मंडळे तसेच फटाके विक्रेत्यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. उत्सवाच्या उत्साहात नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची खबरदारी घेण्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.मुंबई उच्च न्यायालयाने 22 सप्टेंबर 2026 रोजी जनहित याचिका क्रमांक 1/2026 मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने 15 ऑक्टोबर रोजी स्पष्टीकरण देण्यात आल्याचे पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार, सार्वजनिक रस्त्यांवरील फटाके फोडण्यासंदर्भातील निर्बंध आणि ध्वनिप्रदूषणासंबंधीचे नियम विविध सण-उत्सवांच्या काळातही लागू राहणार आहेत. सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यास कोणतीही सवलत लागू नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे दिवाळी किंवा अन्य सणांच्या निमित्ताने सार्वजनिक रस्ते, चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी फटाके फोडताना नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे.ध्वनिप्रदूषणाच्या नियमांनुसार, रात्री 10 ते सकाळी 6 या वेळेत आवाज करणारे फटाके फोडण्यास बंदी असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. सण-उत्सवांच्या काळातही या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

विशेषतः रुग्णालये, शाळा, न्यायालये आणि शांतता क्षेत्रांमध्ये ध्वनी व फटाक्यांमुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ध्वनिप्रदूषणामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि संवेदनशील व्यक्तींना त्रास होऊ शकतो. त्यामुळे उत्सव साजरा करताना इतरांच्या आरोग्याचा आणि शांततेचा विचार करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी अधोरेखित केले आहे.सार्वजनिक उत्सव, मिरवणुका आणि अन्य कार्यक्रमांमध्ये डीजे किंवा ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय ध्वनिक्षेपकांचा वापर करू नये, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.काही विशेष अधिसूचित सणांसाठी रात्री 12 वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वापरण्याची सवलत असू शकते. मात्र, ही सवलत आपोआप लागू होत नसून त्यासाठी स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे उत्सव मंडळांनी कार्यक्रमांचे नियोजन करताना संबंधित नियम आणि परवानगीच्या अटींचे पालन करावे.सण-उत्सवांमध्ये मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सार्वजनिक आयोजनांदरम्यान लेझर लाइट तसेच तीव्र प्रकाशझोतांचा वापर करू नये, असेही पोलिसांनी सांगितले आहे. अशा प्रकाशयोजनांमुळे नागरिकांना आणि इतरांना त्रास होण्याची शक्यता लक्षात घेऊन आयोजकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.फटाके विक्रेत्यांनी वैध परवाने घेणे, अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आणि स्फोटक पदार्थांशी संबंधित कायदेशीर तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. फटाक्यांची विक्री आणि साठवणूक करताना सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष करू नये, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक उत्सव मंडळांनीही कार्यक्रमांचे आयोजन करताना ध्वनिप्रदूषण, फटाक्यांचा वापर आणि प्रकाशयोजनांबाबत लागू असलेल्या नियमांचे पालन करावे. नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची जबाबदारी आयोजकांनी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.फटाक्यांच्या धुरामुळे वायुप्रदूषण वाढण्याबरोबरच श्वसनविकार आणि अन्य आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरे करावेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 22/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पीसीयू मध्ये राष्ट्रीय आयइइइ परिसंवादातून एआय उदयोन्मुख तंत्रज्ञानाला चालना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि उद्योग क्षेत्राशी अर्थपूर्ण समन्वय ठेवण्याची बांधिलकी असल्याचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे एआय उदयोन्मुख तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय आयइइइ परिसंवादात उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सोनवणे बोलत होते.**



यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एमआयटी विद्यापीठ, सिम्बायोसिस विद्यापीठ, टी. बी. सानस महाविद्यालय, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूर, एआयएसएसएमएस, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि संदिप विद्यापीठ यांसह विविध शैक्षणिक संस्थांतील 110 प्रतिनिधी सहभागी झाले होते. "एआय चलित अभियांत्रिकी शिक्षण" या चर्चेत उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. उच्च तंत्रज्ञान देवाणघेवाण, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत, एआय आधारित उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि त्यांचे व्यावहारिक उपयोग यावर तज्ञांनी चर्चा केली. तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण आणि विविध शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीयू व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. कुलसचिव डॉ. अनिल माहेश्वरी, अधिष्ठाता डॉ. सचिन पवार, पीसीयू संचालक, संशोधन व विकास संचालक डॉ. भारत काळे, आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. शंकर देवसरकर, इनक्युबेशन व नवोपक्रम, संचालक डॉ. प्रणव चरखा, आंतरराष्ट्रीय संबंध केंद्र संचालक डॉ. विजय पाटील, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अधिष्ठाता डॉ. जयदीप पाटील, संगणक विज्ञान व अभियांत्रिकी डॉ. अमित गाडेकर यांचेही मार्गदर्शन लाभले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सॉफ्टवेअर अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञांना एकत्र आणून या उपक्रमात विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी परिचित होण्याची तसेच त्याच्या व्यावहारिक उपयोगांचे आकलन करण्याची मौल्यवान संधी मिळाली.

# उन्नती सोशल फाउंडेशनचा दांडिया महोत्सव जल्लोषात संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**नवरात्रोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित दांडिया महोत्सव व नृत्य स्पर्धा यंदाही मोठ्या जल्लोषात पार पडल्या. पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानाच्या परिसरात शनिवार, दि. 17 ते सोमवार, दि. 19 ऑक्टोबरदरम्यान आयोजित या महोत्सवात आबालवृद्धांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दांडियाच्या तालावर थिरकणारे नागरिक, विविध नृत्य स्पर्धांमधील कलाकारांचा उत्साह आणि उपस्थितांचा भरभरून प्रतिसाद यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि नागरिकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवाने पिंपळे सौदागर परिसरात विशेष रंगत आणली.**



या महोत्सवाचे उद्घाटन मा. आमदार अश्विनी जगताप आणि पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका अनिता काटे, सामाजिक कार्यकर्ते व गोसेवक ह.भ.प. विजय शेठ जगताप, पी. के. इंटरनॅशनल स्कूलचे संचालक जगन्नाथअप्पा काटे, सामाजिक कार्यकर्ते संदेश काटे, सपना काटे, उद्योजक राजू भिसे, ऑल सिनिअर सिटिझन्स असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे, आनंद हास्ययोग क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर आणि उन्नती सखी मंचच्या सदस्या यांची प्रमुख उपस्थिती होती. उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक श्री. संजय भिसे तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीच्या सदस्या तथा नगरसेविका डॉ. कुंदाताई संजय भिसे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

उद्घाटनप्रसंगी आमदार अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि नगरसेविका अनिता काटे यांनी मनोगत व्यक्त करून उन्नती सोशल फाउंडेशनच्या दांडिया महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना एकत्र आणण्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.नगरसेविका डॉ. कुंदा संजय भिसे म्हणाल्या, “उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनहिताचे उपक्रम राबविले जातात. दांडिया महोत्सव हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून विविध वयोगटांतील नागरिकांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या कलागुणांना वाव देणारा उपक्रम आहे. अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक एकोपा वाढतो, महिलांना आणि युवकांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळते, तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही उत्सवात सहभागी होता येते. नागरिकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हीच आमच्या कार्याची प्रेरणा आहे. यापुढेही नागरिकांच्या सहभागातून सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील.”आमदार अश्विनीताई जगताप म्हणाल्या, “नवरात्रोत्सव हा भक्ती, शक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचा उत्सव आहे. दांडिया महोत्सवासारख्या कार्यक्रमांमुळे नागरिकांना एकत्र येण्याची, आनंद साजरा करण्याची आणि आपल्या परंपरांचे जतन करण्याची संधी मिळते. उन्नती सोशल फाउंडेशनने सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करून नागरिकांना एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या महोत्सवाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आनंददायी असून, फाउंडेशनच्या पुढील सामाजिक व सांस्कृतिक वाटचालीस माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा आहेत.”पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, “समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी सांस्कृतिक उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा कार्यक्रमांमुळे नागरिकांमध्ये आपुलकीची भावना निर्माण होते आणि सामाजिक एकात्मता अधिक दृढ होते.

उन्नती सोशल फाउंडेशनने दांडिया महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना आनंदाचा अनुभव देण्याबरोबरच सांस्कृतिक परंपरा जपण्याचा प्रयत्न केला आहे. नागरिकांचा मोठा सहभाग आणि कार्यक्रमाचे उत्तम आयोजन कौतुकास्पद आहे. फाउंडेशनच्या आगामी उपक्रमांनाही नागरिकांनी असाच प्रतिसाद द्यावा.”

# विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला वारंवार अपमानित करणे, शिवीगाळ करणे आणि मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ केल्याच्या आरोपावरून पतीविरुद्ध देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील फिर्यादी महिलेने पतीविरुद्ध तक्रार दिली आहे. आरोपी रोहित राधाकृष्ण जोशी (वय 35) हा वाकड येथील कुबेर इम्पेरिया परिसरातील बी-502 या सदनिकेत राहतो.

तक्रारीनुसार, 27 डिसेंबर 2021 पासून 20 ऑक्टोबर 2026 पर्यंतच्या कालावधीत आरोपी पतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला वेळोवेळी त्रास दिला. तसेच, फिर्यादी आणि तिच्या आई-वडिलांना तुच्छ लेखून अपमानित करणे, शिवीगाळ करणे, दमदाटी करणे आणि हाताने मारहाण करणे असे प्रकार केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे फिर्यादीचा शारीरिक आणि मानसिक छळ झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 च्या कलम 85, 115(2), 351(2), 351(4), 352 आणि 3(5) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास देहूरोड पोलीस करीत आहेत.

# कासारवाडीत बेकायदा लोखंडी कोयता बाळगणारा तरुण अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घातक शस्त्र बाळगण्यास मनाई असताना बेकायदा लोखंडी कोयता बाळगल्याप्रकरणी एका तरुणाला दापोडी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून सुमारे 200 रुपये किमतीचा लोखंडी कोयता जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शकील कासिम शेख (वय 29), रा. नागरे चाळ, विद्या विकास प्रशालेजवळ, कासारवाडी, पुणे, असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.**



या प्रकरणी दापोडी पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई विलास शांताराम पवार (बक्कल क्रमांक 3284) यांनी फिर्याद दिली आहे. 20 ऑक्टोबर रोजी सायंकाळी महादेव मंदिराजवळ, भोसरी-पिंपळे गुरव उड्डाणपुलाखाली, कासारवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपीने कोणताही परवाना नसताना लोखंडी कोयता बेकायदेशीररीत्या स्वतःजवळ बाळगल्याचे पोलिसांनी नोंदवले आहे.

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत 14 ऑक्टोबर ते 27 ऑक्टोबर 2026 या कालावधीत घातक शस्त्रे बाळगण्यास मनाई करणारा आदेश लागू असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. तसेच आरोपीविरुद्ध यापूर्वी हद्दपारीचा आदेश जारी करण्यात आल्याचा उल्लेखही पोलिसांनी केला आहे. या आदेशाचे उल्लंघन करून शस्त्र बाळगल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियम कलम 4(25) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम 142, 37(1)(3) सह 135 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून, पुढील तपास दापोडी पोलीस करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 22/10/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# पिंपळे सौदागरच्या वाढत्या लोकसंख्येसाठी जलकुंभाची मागणी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपळे सौदागर परिसरातील वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाण्याची मागणीही दिवसेंदिवस वाढत आहे. भविष्यात नागरिकांना पुरेसा आणि सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभाग क्रमांक 28 मधील विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक 4/112 (खेळाचे मैदान – PG) या जागेतून 15 ते 20 गुंठे जागा उपलब्ध करून देत 2.5 एमएलडी क्षमतेचा जलकुंभ उभारण्यात यावा, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते व नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आहे.**





पिंपळे सौदागर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. परिसरात मोठ्या निवासी इमारती आणि गृहप्रकल्पांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने लोकसंख्येतही लक्षणीय वाढ होत आहे. परिणामी, पाणीपुरवठ्यावरील ताण वाढण्याची शक्यता लक्षात घेता, भविष्यातील गरजांचा विचार करून आतापासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचे काटे यांनी निवेदनात म्हटले आहे.परिसरातील वाढती पाण्याची गरज लक्षात घेऊन विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक 4/112 या खेळाच्या मैदानासाठी आरक्षित जागेतून सुमारे 15 ते 20 गुंठे जागा जलकुंभ उभारणीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या ठिकाणी 2.5 एमएलडी क्षमतेचा जलकुंभ उभारल्यास पिंपळे सौदागरमधील नागरिकांना आवश्यक पाणीपुरवठा करण्यासाठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जलकुंभाची उभारणी झाल्यास भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल. वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारी पाण्याची गरज भागविण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरू शकतो. त्यामुळे संबंधित जागेची पाहणी करून नियमानुसार आवश्यक मंजुरी आणि तांत्रिक कार्यवाही पूर्ण करावी, तसेच जलकुंभ उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आहे.

# पिंपरी विधानसभेत भाजपा-महायुतीची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**आगामी पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड येथील हॉटेल बर्ड व्हॅली, चिंचवड येथे पिंपरी विधानसभा मतदारसंघाची अत्यंत महत्त्वाची संघटनात्मक बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. सौ. स्मितताई जाधव (पदवीधर मतदारसंघ) आणि कौस्तुभ गावडे (शिक्षक मतदारसंघ) यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा ठाम निर्धार सर्व उपस्थितांनी व्यक्त केला.**



या बैठकीस पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर निवडणूक पिंपरी विधानसभा प्रभारी तथा आमदार प्रसाद लाड, सहप्रभारी तथा आमदार स्नेहाताई दुबे, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, भाजपा महाराष्ट्र प्रदेश ट्रान्सपोर्ट प्रकोष्ठ प्रभारी अनुप मोरे, पिंपरी-चिंचवड शिक्षक मतदारसंघ निवडणूक संयोजक राजेशअण्णा पिल्ले आणि सदाशिव खाडे, उपमहापौर शर्मिला बाबर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बैठकीला सर्व माजी नगरसेवक, सर्व भाजपा सरचिटणीस, पिंपरी विधानसभेतील सर्व मंडल अध्यक्ष, पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर निवडणूक पिंपरी विधानसभेतील प्रमुख कार्यकर्ते, भाजपाचे विविध आघाड्यांचे पदाधिकारी तसेच निवासी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आगामी निवडणुकीच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तळागाळातील मतदार नोंदणी, प्रत्यक्ष संपर्क अभियान आणि संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना विधानपरिषदेवर पाठवण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी ताकदीने मैदानात उतरण्याचे आवाहन यावेळी प्रमुख नेत्यांनी केले.यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी नमूद केले की, शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महायुती सरकारने घेतलेले जनहितकारी निर्णय आणि धोरणे घराघरांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

बूथ स्तरावर मजबूत नेटवर्क तयार करून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचूया आणि दोन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करूया.